# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-23.04.2026** **वार- गुरुवार**

---

**पोटनिवडणूक**

बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत पाच वाजेपर्यंत 52 पूर्णांक 44 टक्के मतदान झालं आहे. आज सकाळी काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि खासदार पार्थ अजित पवार यांनी मतदानाचा हक्क बजावला.

**पेट्रोल**

पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये संभाव्य वाढीची शक्यता वर्तवणाऱ्या बातम्यांचं पेट्रोलियम मंत्रालयानं खंडन केलं आहे. अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन नसल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. गेल्या चार वर्षांत पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये वाढ न झालेला भारत हा एकमेव देश असल्याचं मंत्रालयानं अधोरेखित केलं आहे.

**अभ्यासक्रम शुल्क**

राज्यातील व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्क संदर्भातील अनिश्चितता दूर करण्यासाठी बीबीए, बीसीए, बीबीएम, बीएमएस आणि इंटिग्रेटेड एमबीए या अभ्यासक्रमांच्या शिक्षण शुल्क संदर्भातील अधिकार संबंधित विद्यापीठांना देण्यात आल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी या अभ्यासक्रमांचे शुल्क विद्यापीठांनी निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याच अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2025-26 साठीही लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे संबंधित अभ्यासक्रमांच्या शुल्क संरचनेत एकसंधता आणि स्पष्टता निर्माण होणार असून, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी कमी होतील.

**रेल्वे**

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून 15 ऑगस्टपर्यंत पुणे-परळी रेल्वे सुरू करण्याची मागणी बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी बीड इथं झालेल्या बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे. त्याचबरोबर सोनवणे यांनी बीड-अहिल्यानगर-मुंबई आणि बीड-अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी सेवा सुरू करण्याचीदेखील मागणी केली आहे.

**मराठी-रिक्षा**

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा, टॅक्सी, ओला-उबर आणि ई-बाईक टॅक्सीतील अमराठी चालकांनी प्रवाशांशी मराठीत संवाद साधणे अनिवार्य करण्याबाबत बैठक घेतली. मुंबई मराठी साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषद यांनी जुजबी व्यावहारिक मराठी शिकवण्यासाठी पुढाकार दर्शविला आहे. त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम लवकरच तयार करण्यात येणार असल्याची माहिती देताना यासाठी 72 शाखांमधून शिकवणी वर्ग सुरू केले जाणार असून मुंबई मराठी साहित्य संघाने स्वयंसेवी शिक्षकांच्या माध्यमातून ऑनलाईन मराठी भाषा प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शविली आहे. या प्रशिक्षणासाठी चालकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**खते-बियाणे**

पुणे जिल्ह्यात खरीप 2026 साठी खत तसंच बियाण्यांचा सुरळीत पुरवठा करण्यासाठी आज जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. कंपन्यांना वेळेत साठा, एप्रिल-मेपर्यंत पुरवठा, संतुलित वितरण, रेल्वे समन्वय आणि वाहतूक करार नूतनीकरणाचे निर्देश देण्यात आले. बफर स्टॉक मे अखेर पूर्ण करणे, तसेच इंद्रायणी भात, उडीद तसंच पर्यायी पिकांच्या बियाण्यांचा पुरेसा साठा ठेवण्यावर भर देण्यात आला. कृत्रिम टंचाई टाळण्याचा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे. सर्व कंपन्यांनी कृषी

आयुक्तालयाच्या सुचनेनुसार वेळेत पुरवठा करणे आवश्यक असल्याचं जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी यावेळी सांगितलं.

**आरोग्य-बोर्डीकर**

राज्यातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी निधीचे योग्य आणि परिणामकारक नियोजन करण्याचे निर्देश आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले आहेत. 2025-26 या आर्थिक वर्षातील राज्य निधी तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्राप्त निधीच्या वापराच्या आढावा बैठकीत त्या मुंबईत  बोलत होत्या.

**परीक्षा**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या गुण सुधारणेसाठीच्या परीक्षेला 15 मे पासून सुरुवात होणार आहे. विज्ञान, गणित, सामाजिक विज्ञान आणि भाषा विषयात कामगिरी सुधारायची असेल तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहेत.15 एप्रिलला इयत्ता दहावीच्या नियमित परीक्षेचा निकाल जाहीर झाला होता.

**पिंचिं-बाबर**

पिंपरी चिंचवडमहानगरपालिकाच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पिंपरी इथल्या जिजामाता रुग्णालयाला भेट देत स्वच्छता, औषधसाठा, डॉक्टर-परिचारिकांचीउपलब्धता आणि उपचार प्रक्रियेची पाहणी केली. रुग्णांची विचारपूस करून गैरसोयटाळण्याच्या सूचना बाबर यांनी यावेळी दिल्या.

**फिडरबस**

महाराष्ट्र मेट्रो रेलकॉर्पोरेशन लिमिटेडच्या पिंपरी मेट्रो स्थानक येथून पी एम पी एम एल कडून  काळेवाडी फाट्यापर्यंत फीडर बससेवा सकाळी साडेसहा  ते रात्री साडेनऊ या वेळेत सुरु करण्यात आली आहे. यामुळे काळेवाडी, रहाटणीसह परिसरातील प्रवाशांची सोय झाली आहे. यासेवेअंतर्गत प्रवाशांना 10 ते 20 रुपयांत प्रवास करता येणार असून, गर्दीच्या वेळी 15 मिनिटांनी आणि इतर वेळी 30 मिनिटांनी बस उपलब्ध राहणार आहे.

**कंपनी बंद**

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीलिमिटेड कंपनी बंद करण्याचे आदेश राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने दिले आहेत.'स्मार्ट सिटी'च्या मालमत्तांचे हस्तांतर करून नेमलेल्या कंत्राटी अधिकारी,कर्मचाऱ्यांनाही कार्यमुक्त करावे, असे स्पष्ट करण्यात आलं आहे. 'स्मार्ट सिटी'चे अपूर्ण प्रकल्प महापालिकेकडे हस्तांतरितकरण्यात येणार आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 40 तर किमान तापमान 21 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही याच स्वरूपाचे तापमान तसच संध्याकाळी आकाश अंशतः ढगाळ राहून अतिहलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत; उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 06 वाजता; ताज्या पुणे वृत्तांतसह तोपर्यंत, नमस्कार.**